# नियमित दिवाणी दावा क्र.५४/२०२४ मधील

**CNR No. MHRT050003662024**

## <u>निशाणी क्र.२७ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.४ गीता दुर्गाराम कदम यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करण्याची व तशी दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी सादर केला आहे.

**०२.** वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.४ गीता दुर्गाराम कदम यांचे दि.२६.११.२०२४ रोजी निधन झाले आहे. प्रतिवादी क्र.४ यांना किशोर दुर्गाराम कदम व मनोज दुर्गाराम कदम हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त प्रतिवादी क्र.४ यांना अन्य कोणीही वारस नाही. सदर वारस रेकॉर्डवर न आल्यास वादी यांचे पैशाचे स्वरुपात न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, वादी यांनी प्रतिवादी क्र.४ यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करण्याची व तशी दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्यासाठी सदरचा अर्ज सादर केला आहे.

**०३.** प्रस्तुत विचाराधीन अर्जातील कथनांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे स्वरुप व अभिलेखाचे अवलोकन करता वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा सरस, निरस, तुटक, वाटप होऊन मिळणेकरिता दाखल केला आहे. वादीतर्फे वकीलांनी दस्तयादी नि.२२ सोबत मयत प्रतिवादी क्र.४ यांचा मृत्यू दाखला हजर केला आहे. मयत प्रतिवादी क्र.४ यांच्या वारसांना दाव्यात समाविष्ट करुन न घेतल्यास त्यांच्या हक्कसंबंधावर बाधा येऊ शकते व त्यांच्याशिवाय सदरचा दावा हा गुणवत्तेवर निकाली होणार नाही. सबब, सदरचा अर्ज हा मंजूर करण्यास पात्र आहे. करीता खालील आदेश पारित करण्यात येतो.

### <u>आदेश</u>

१. अर्ज (नि.२७) मंजूर करण्यात येतो.

२.	वादी यांना प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर आणण्यास परवानगी देण्यात येते. त्याप्रमाणे त्यांनी वादपत्रात चौदा दिवसांच्या आत आवश्यक ती दुरुस्ती करुन घ्यावी.

३.	दावा दुरूस्ती केल्यानंतर दाव्याची दुरूस्त प्रत या न्यायालयास व पर्यायाने विरुध्द पक्षास पुरविणेची आहे.

MHASKE DADA GOPINATH

Digitally signed by MHASKE DADA GOPINATH
Date: 2026.08.07 17:27:59 +0530

**(डी. जी. म्हस्के)**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, खेड

**दिनांक – ०७.०८.२०२६**

ता. खेड, जि. रत्नागिरी.

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | RCS No.54/2024 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Sou. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC Court, Khed. |
| Date of Decision | : | 07.08.2026 |
| Order signed by Presiding Officer on | : | 07.08.2026 |
| Judgment/Order uploaded on | : | 07.08.2026 |